| | |
|---|---|
| Publication – Saamna | Page No. 10 |
| Edition – Print | Date – 10/10/2021 |

# करो संभवच्या प्रांशू सिंघल यांना 'एसईओवाय' पुरस्कार

मुंबई : श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेनरशिप आणि ज्युबिलंट भारतीय फाऊंडेशनच्या वतीने करो संभवच्या प्रांशू सिंघल यांना 'सोशल आंत्रप्रेनर ऑफ दि इयर' पुरस्काराने गौरविण्यात आले. देशाचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. के. विजय राघवन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. एसईओवाय इंडिया ॲवॉर्ड २०२१ चे विजेते करो संभवचे प्रांशू सिंघल हे चक्रीय अर्थव्यवस्था शक्य करण्यासाठी कार्यरत आहेत आणि ते उद्योगांना त्यांच्या प्रत्यक्ष अडचणी सोडवण्यात मदत करतात. करो संभवमध्ये ई–कचरा, प्लॅस्टिक पॅकेजिंग कचरा, बॅटरी कचरा आणि काच या गोष्टींवर काम केले जाते आणि मॅट्रेस आणि वस्त्रोद्योग यांच्यासारख्या कमी लक्ष केंद्रित केलेल्या क्षेत्रांबाबतही ते पुढाकार घेत आहेत. प्रांशू यांचे उद्दिष्ट उत्तमरीत्या प्रशासित आणि उत्तरदायी असलेल्या एंड ऑफ लाइफ कचरा व्यवस्थापन उद्योगाला पारदर्शक कार्यपद्धतींद्वारे आकार देऊन वाढवण्याचे आहे.